# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 11 October 2025

Time 7.10 AM to 7.20 AM

Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक ११ ऑक्टोबर २०२५ सकाळी ७.१० मि.

****

- प्रधानमंत्री धन धान्य कृषी योजनेचा आज पंतप्रधानांच्या हस्ते प्रारंभ–योजनेत राज्यातल्या नऊ जिल्ह्यांचा समावेश
- स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत काही ठिकाणी मैत्रीपूर्ण लढतींचे मुख्यमंत्र्यांचे संकेत
- शेतकरी कर्जमाफीचा निर्णय योग्यवेळी घेणार–उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचं आश्वासन
- ॲपआधारित प्रवासी वाहतुकीसाठी मोटर वाहन ॲग्रीगेटर या मसुदा नियमावलीची घोषणा
- नांदेड, परभणी तसंच हिंगोली जिल्ह्यातल्या पंचायत समिती सभापती पदांचं आरक्षण जाहीर

आणि

- मोसमी पावसाचा राज्यातून परतीचा प्रवास सुरू

****

प्रधानमंत्री धन धान्य कृषी योजनेला आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते नवी दिल्लीत प्रारंभ होणार आहे. उत्पादकता वाढवणं, उत्पादनाची शाश्वतता सुनिश्चित करणं, तसंच काढणी पश्चात तंत्रज्ञान आणि पतपुरवठा प्रणाली मजबूत करण्याच्या उद्देशानं ही योजना राबवली जाणार आहे. यासाठी देशातल्या १०० जिल्ह्यांची निवड करण्यात आली असून, त्यात राज्यातल्या छत्रपती संभाजीनगर, बीड आणि नांदेडसह नऊ जिल्ह्यांचा समावेश आहे. या योजनेची माहिती देतांना केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी, कडधान्यांचं उत्पादन कमी असलेल्या जिल्ह्यांचं उत्पादन सरासरीएवढं झालं तरीही, ती या क्षेत्रात मोठी वाढ ठरेल, असं सांगितलं. ते म्हणाले...

**बाईट – केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान**

देशात आज विविध ठिकाणी होणाऱ्या या कार्यक्रमांत शेतकरी दूरस्थ पद्धतीनं सहभागी होतील. महाराष्ट्राचा राज्यस्तरीय कार्यक्रम पुण्यात कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. या कार्यक्रमात कृषी क्षेत्रात प्रयोगशील आणि प्रगतिशील कामगिरी करणारे ३०० हून अधिक शेतकरी सहभागी होणार असल्याचं कृषीमंत्री भरणे यांनी सांगितलं.

✻✻✻✻

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी निवडणुका महायुतीच्या माध्यमातूनच लढवण्यात येतील परंतु काही ठिकाणी मैत्रीपूर्ण लढतींचे संकेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले, ते काल नाशिक इथं पक्षाच्या नियोजन बैठकीनंतर पत्रकारांशी बोलत होते. दरम्यान छत्रपती संभाजीनगर इथंही काल मुख्यमंत्र्यांनी पक्ष पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना एका बैठकीत मार्गदर्शन केलं. अतिवृष्टीच्या नुकसान भरपाईच्या मुद्यावरून विरोधकांच्या प्रस्तावित आंदोलनावर मुख्यमंत्र्यांनी टीका केली.

✻✻✻✻

योग्य वेळ आली की शेतकरी कर्जमाफीचा निर्णय महायुती सरकार घेईल, असं आश्वासन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिलं आहे. काल छत्रपती संभाजीनगर इथं पत्रकार परिषदेत बोलतांना त्यांनी ही ग्वाही दिली...

**बाईट – उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे**

शिंदे यांनी यावेळी अतिवृष्टीग्रस्तांना केलेल्या मदतीचा आढावा घेत, राज्य सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी असल्याचा पुनरुच्चार केला. दरम्यान, शिवसेना पदाधिकारी मेळाव्याला उपमुख्यमंत्र्यांनी काल मार्गदर्शन केलं, शिवसेनेच्या प्रचार कार्यालयाचं उद्घाटनही त्यांच्या हस्ते काल करण्यात आलं.

✻✻✻✻

राज्य शासनाने "मोटर वाहन ॲग्रीगेटर नियम, २०२५" या मसुदा नियमावलीची काल घोषणा केली. येत्या १७ ऑक्टोबरपर्यंत यावर हरकती आणि सूचना मागवण्यात आल्या आहेत. राज्यातील ॲप-आधारित प्रवासी वाहतूक सेवांमध्ये शिस्तबद्धता, पारदर्शकता आणि प्रवासी सुरक्षेच्या उद्देशानं ही नियमावली लागू करत असल्याची माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली. यामध्ये वाहन परवाना, परवान्याचं नूतनीकरण, चालकाच्या कामाचे तास, भाड्याचं नियमन, प्रवाशांचा विमा, आदी नियमांचा समावेश करण्यात आला आहे.

✻✻✻✻

वीज कर्मचारी संघटनांनी आपला संप मागे घेतला आहे. ७२ तासांच्या संपाविरोधात वीज महावितरण कंपनीने मुंबई औद्योगिक न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेवर काल सुनावणी झाली. या सुनावणी दरम्यान संयुक्त कृती समितीने संप मागे घेत असल्याचं सांगितलं.

****

मराठवाड्यातील पूरग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदतीच्या मागणीसाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षातर्फे आज छत्रपती संभाजीनगर इथं हंबरडा मोर्चा काढण्यात येत आहे. सकाळी अकरा वाजता क्रांती चौकातून मोर्चाला सुरुवात होईल.

****

आरक्षणासंदर्भात राज्य सरकारने दोन सप्टेंबररोजी काढलेला शासननिर्णय रद्द करण्याच्या मागणीसाठी ओबीसी संघटनांनी काल नागपुरात महामोर्चा काढला. सकल ओबीसी संघटनांनी आपल्या मागण्यांचं निवेदन मुख्यमंत्र्यांना सादर केलं.
दरम्यान, राज्य शासनाचा हा आदेश फक्त हैदराबाद गॅझेटपुरता मर्यादित असल्याचं, महसूलमंत्री तथा मंत्रिमंडळ ओबीसी उपसमितीचे अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी स्पष्ट केलं आहे. ते काल मुंबईत बोलत होते. ओबीसींच्या ३५३ जातींचं हित जोपासण्याचा पूर्ण प्रयत्न केला आहे. त्यामुळे ओबीसी समाजात संभ्रम पसरवू नये, असं आवाहन बावनकुळे यांनी केलं.

****

नांदेड, परभणी आणि हिंगोली जिल्ह्यातल्या पंचायत समित्यांच्या सभापती पदांची आरक्षण सोडत काल काढण्यात आली. याबाबत अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून…

> ***‘‘नांदेड जिल्ह्यात भोकर तसंच मुदखेड पंचायत समितीचं सभापती पद अनुसूचित जाती महिला प्रवर्गासाठी आरक्षित झालं आहे. हिमायतनगर तसंच किनवट अनुसूचित जाती, उमरी अनुसूचित जमाती, नांदेड आणि हदगाव मागास प्रवर्ग तर नायगाव आणि लोहा मागास प्रवर्ग महिलांसाठी राखीव झालं आहे. देगलूर, मुखेड, बिलोली आणि धर्माबाद सर्वसाधारण महिला प्रवर्गासाठी तर कंधार, अर्धापूर आणि माहूर सभापती पद सर्वसाधारण प्रवर्गासाठी राखीव झालं आहे.***
>
> ***परभणी जिल्ह्यात सोनपेठ अनुसूचित जाती महिला प्रवर्गासाठी, पाथरी मागास प्रवर्ग महिला, तर पूर्णा सभापती पद मागास प्रवर्गासाठी राखीव झालं आहे. पालम, जिंतूर आणि मानवत सर्वसाधारण महिला प्रवर्गासाठी, तर परभणी, गंगाखेड, आणि सेलू सभापती पद सर्वसाधारण गटासाठी राखीव झालं आहे.***

***हिंगोली जिल्ह्यात वसमत–अनुसूचित जाती, औंढा नागनाथ अनुसूचित जमाती महिला, सेनगाव मागास प्रवर्ग महिला, तर कळमनुरी सर्वसाधारण गटासाठी आणि हिंगोली पंचायत समितीचं सभापती पद सर्वसाधारण महिला गटासाठी राखीव झालं आहे.''***

दरम्यान, छत्रपती संभाजीनगर जिल्हा परिषद आणि पंचायत समिती आरक्षण सोडत परवा सोमवारी काढण्यात येत आहे.

****

नैऋत्य मोसमी पावसाचा राज्यातून परतीचा प्रवास कालपासून सुरू झाला. मान्सूनच्या परतीची सीमारेषा अलिबाग, अहिल्यानगर, आणि अकोला तिथून जात आहे. पुढच्या तीन ते चार दिवसात राज्याच्या इतर भागातूनही मान्सूनच्या परतीसाठी परिस्थिती अनुकूल असल्याची माहिती हवामान विभागानं दिली आहे.

****

क्रिकेट

भारत आणि वेस्ट इंडीज दरम्यान दुसरा आणि मालिकेतल्या अखेरचा कसोटी क्रिकेट सामना कालपासून सुरू झाला. दिल्लीत सुरू असलेल्या या सामन्यात कालच्या दोन बाद ३१८ धावसंख्येवरून भारत आज खेळ पुढे सुरू करेल. काल पहिल्या दिवसाचा खेळ थांबला तेव्हा यशस्वी जैस्वाल १७३ तर शुभमन गिल २० धावांवर खेळत होते.

****

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात सेवा पंधरवड्यादरम्यान राबवण्यात आलेल्या `स्वस्थ नारी, सशक्त परिवार अभियानाला` नागरिकांनी भरभरून प्रतिसाद दिला. या राष्ट्रीय अभियानात महिलांचा सहभाग लक्षणीय ठरल्याचं, याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

जागतिक मानसिक आरोग्य दिनानिमित्त तुळजापूर इथं ग्रामसेवक, तलाठी आणि स्वयंसेवी संस्थांच्या प्रतिनिधींसाठी “मानसिक आरोग्य आणि समुपदेशन कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम” घेण्यात आला. धाराशिवचे जिल्हाधिकारी कीर्ति किरण पुजार यांनी या कार्यशाळेला मार्गदर्शन केलं.

****

जालना जिल्ह्यातील विविध बँकांमध्ये दावा न केलेल्या सुमारे तीस कोटी रुपयांच्या ठेवी शिल्लक आहेत. जवळपास दीड लाख खातेदारांना या ठेवी परत मिळवून देण्यासाठी ३१ डिसेंबरपर्यंत विशेष मोहीम हाती घेण्यात आली आहे. जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक मंगेश केदार यांनी ही माहिती दिली.

****

अतिवृष्टी बाधित शेतकऱ्यांच्या पशूधनास चारा उपलब्ध करून देण्याचे निर्देश वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष निलेश हेलोंडे पाटील यांनी दिले आहेत. काल छत्रपती संभाजीनगर इथं आढावा बैठकीत ते बोलत होते. आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबातील सदस्यांना जिल्हा अग्रणी बँकेकडून प्रशिक्षण देण्याची सूचनाही पाटील यांनी यावेळी केली.

****

बीड जिल्ह्यातल्या मौजे कपिलधारवाडी आणि मौजे हिंगणी खुर्द या गावांच्या पुनर्वसनासंदर्भात काल जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक झाली. जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांना नागरिकांच्या सुरक्षेला प्राधान्य देत पुनर्वसनाचं काम नियोजनबद्ध आणि तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश दिले.

****

मध्य रेल्वेने सणांच्या पार्श्वभूमीवर, मुंबई ते करीमनगर विशेष वातानुकुलीत रेल्वेगाडी चालवण्याचा निर्णय घेतला आहे. ही गाडी मुंबईच्या छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसवरून आज रात्री बारा वाजून वीस मिनिटांनी तर करीमनगरहून आज सायंकाळी साडेपाच वाजता सुटणार आहे.

****

छत्रपती संभाजीनगर इथं परवा सोमवारी भूमी लोकअदालतीचं आयोजन करण्यात आलं आहे. प्रलंबित प्रकरणं निकाली काढण्यासाठी या अदालतीमध्ये सहभागी होण्याचं आवाहन प्रशासनानं केलं आहे.

****